**हवामानावर आधारीत कृषि सल्ला (रत्नागिरी जिल्हा)**

**(ग्रामीण कृषि मौसम सेवा, डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली आणि प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने)**

**(०२३५८) २८२३८७**

**अंक १९/२०२०** **दिनांक ०६/०३/२०२०** **कालावधी ५ दिवस**


| **डॉ. प्रशांत बोडके,** | **डॉ. विजय मोरे,** | **डॉ. शितल यादव,** |
|---|---|---|
| विभाग प्रमुख, | नोडल ऑफिसर, | तांत्रिक अधिकारी |
| कृषिविदया विभाग | कृषिविदया विभाग | कृषिविदया विभाग |
| ९४२०४१३२५५ | ९४२२३७४००१ | ८३७९९०११६० |


| मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक २९/०२/२०२० ते ०६/०३/२०२०) | | | | | | | हवामानाचे घटक | हवामान पूर्वानुमान (दिनांक ०७/०३/२०१९ सकाळी ८:३० पासून ११/०३/२०२० सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २९/०२ | ०१/०३ | ०२/०३ | ०३/०३ | ०४/०३ | ०५/०३ | ०६/०३ | | ०७/०३ | ०८/०३ | ०९/०३ | १०/०३ | ११/०३ |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | पाऊस (मिमी) | ० | ० | ० | ० | ० |
| ३५.० | ३४.४ | ३३.० | ३२.५ | ३०.८ | २९.८ | २९.० | कमाल तापमान (अं.से) | ३१ | ३१ | ३० | २९ | २९ |
| १५.० | १५.५ | १५.० | १४.० | १४.५ | १४.५ | १७.० | किमान तापमान (अं.से) | २१ | २१ | २० | १९ | १९ |
| ० | ० | ० | ० | ० | ० | ४ | मेघाच्छादन (ऑक्टा) | ० | १ | १ | १ | २ |
| ८५ | ९० | ८९ | ९० | ९१ | ९३ | ९२ | सकाळची सापेक्ष आर्द्रता | ८९ | ८९ | ८० | ९१ | ९० |
| ४८ | ५४ | ४८ | ४७ | ५० | ५९ | - | दुपारची सापेक्ष आर्द्रता | ४० | २८ | २७ | ३५ | ४१ |
| ३.७ | ३.२ | ३.४ | ३.८ | ३.६ | ३.८ | ३.६ | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | ५ | ४ | ६ | ४ | ४ |
| शांत | शांत | शांत | शांत | शांत | शांत | शांत | वाऱ्याची दिशा | पू. | आ.पू. | नै.द. | पू. | आ.द. |

| पाऊस (मिमी) मागील आठवडयातील- | पाऊस (मिमी) १/१/२०२० पासून आजपर्यंत | पाऊस (मिमी) गेल्या वर्षीचा |
|---|---|---|
| ०.० | ०.० | ५१३०.९ |

**हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला**

**दिनांक ७ ते ११ मार्च २०२० दरम्यान आकाश निरभ्र राहील.**

| पिक | अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| **वाल** | **काढणी अवस्था** | • वाल पिकाची काढणी जसजशा शेंगा वाळतील तसतशी शेंगांची तोडणी करून ४ ते ५ दिवस शेंगा उन्हात वाळवाव्यात व मळणी करावी किंवा शेंगा झाडावर वाळल्यानंतर पिकाची कापणी करून झाडे खळ्यावर ३ ते ४ दिवस उन्हात वाळवावीत व नंतर मळणी करावी. साठववणूकीमध्ये भुंग्याचा उपद्रव टाळण्यासाठी वालाचे दाणे मातीच्या खळीचा थर देऊन चांगले वाळवावे. |
| **आंबा** | **मोहोर अवस्था ते फळधारणा** | • मोहोर अवस्थेत असलेल्या आंबा पिकावर कीड व रोगाच्या नियंत्रणासाठी मोहोर संरक्षण वेळापत्रकानुसार तिसरी फवारणी मोहोर फुलण्यापुर्वी (दुसऱ्या फवारणी नंतर १५ दिवसांनी) नियंत्रणासाठी इमिडाक्लोर्प्रीड १७.८ टक्के प्रवाही ३ मि. ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. तसेच फवारणीच्या वेळेस किटकनाशकाच्या द्रावणामध्ये भुरी रोगाच्या नियंत्रणासाठी ५ टक्के हेक्झाकोनॅझोल ५ मि. ली. किंवा पाण्यात विरघळणारे ८० टक्के गंधक २० ग्रॅम प्रति १० लिटर या प्रमाणात वापरावे.<br>__टिप:__ फवारणी करताना मोहोर नुकताच फुलत असल्यास आणि फळधारणा झालेली नसल्यास शक्यतो फवारणी फळधारणा होईपर्यंत टाळावी किंवा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात असल्यास आणि फवारणी करणे गरजेचे असल्यास बागेतील परागीकरण करणाऱ्या कीटकांचा परागीकरणाचा कालावधी (सकाळी १० ते दुपारी १२ वाजेपर्यंत) वगळून फवारणी करावी.<br>• फळधारणा झालेल्या आंबा बागेमध्ये वाटाणा आकाराच्या अवस्थेत तुडतुड्याचा, फुलकिडीचा आणि भुरी रोगाचा प्रादुर्भाव आढळून येण्याची शक्यता असल्यामुळे मोहोर संरक्षण वेळापत्रकानुसार चौथी फवारणी (तिसऱ्या फवारणीनंतर १५ दिवसांच्या अंतराने) थायमेथाक्झाम २५ टक्के डब्ल्यु. जी. १ ग्रॅम + भुरी रोगाच्या नियंत्रणासाठी ५ टक्के हेक्झाकोनॅझोल ५ मि. ली. किंवा पाण्यात विरघळणारे ८० टक्के गंधक २० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यातून फवारणी करावी.<br>• फळधारणा झालेल्या आंबा बागेमध्ये (वाटाणा अवस्था), फळगळ कमी करण्यासाठी, पाण्याच्या उपलब्धतेनुसार १५० ते २०० लिटर पाणी प्रती झाडास या प्रमाणात १५ दिवसांच्या अंतराने ३ ते ४ पाण्याच्या पाळ्या दयाव्यात तसेच झाडाच्या बुंध्याभोवती गवताचे आच्छादन करावे.<br>• उत्पादन व फळांची प्रत सुधारण्यासाठी १ टक्के पोटॅशियम नायट्रेटची फवारणी फळे वाटाणा, गोटी व अंडाकृती अवस्थेत असताना करावी.<br>• फळे गोटी ते अंडाकृती आकाराची असताना डॉ.बा.सा.कों.कृ.विद्यापीठाने दिलेल्या शिफारशी नुसार फळगळ कमी करण्यासाठी, फळाचा आकार व वजन वाढून डाग विरहीत फळांसाठी, फळामधील साक्याचे प्रमाण कमी करण्यासाठी आणि फळमाशीपासून संरक्षण करण्यासाठी २५ x २० सें.मी. आकाराची कागदी पिशवी लावावी.<br>• हापूस आंबा फळाचे अधिक उत्पादन मिळण्यासाठी ५५ टक्के तीव्रतेचे गोमूत्र, फळे वाटाण्याचा आकाराची असल्यापासून पुढे आठवड्याच्या अंतराने उपलब्धतेनुसार ३ ते ६ वेळा फवारावे. |
| **काजू** | **फुलोरा ते फळधारणा अवस्था** | • काजू पिकामध्ये उशिराने येत असलेल्या नवीन पालवीवर ढेकण्याचा प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता असल्याने पालवीचे किडीपासून संरक्षण करण्याकरिता मोनोक्रोटोफॉस ३६ टक्के प्रवाही १५ मि.ली. किंवा लॅम्बडासायहॅलोथ्रीन ५ टक्के प्रवाही ६ मि.ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |

| | | |
|---|---|---|
| | | • फुलोऱ्या अवस्थेत असलेल्या काजूची फळधारणा वाढविण्यासाठी १० पी.पी.एम. इथ्रेल या संजीवकाची फवारणी फुलोरा अवस्थेत करावी. पाण्याची उपलब्धता असल्यास फुलोरा ते फळधारणा अवस्थेत काजूला पाणी देण्याची व्यवस्था करावी.<br>• काजू बियांचे उत्पादन व बियांचे आकारमान वाढविण्यासाठी प्रति झाड ताज्या किंवा आठ दिवसापर्यंत साठविलेल्या २५ टक्के गोमुत्राची फवारणी (५ लिटर द्रावण) आणि २५ टक्के गोमुत्राची झाडाच्या बुंध्यामध्ये जिरवणी (१० लिटर द्रावण) करावी.<br>• काजू बिया पूर्ण तयार झाल्याशिवाय बियांची काढणी करू नये. काढणी केलेल्या बिया उन्हामध्ये ७ ते ८ दिवस वाळवून साठवणूक करावी. |
| **नारळ** | - | • नारळावर रुगोज चक्राकार पांढरी माशीचा प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता असून या किडीची पिल्ले आणि प्रौढ पानाच्या खालील बाजूस रस शोषतात. माशीच्या शरीरातून स्त्रवणाऱ्या गोड चिकट स्त्रावाकडे मुंग्या आकर्षित होतात. त्यांच्यामुळे स्त्राव सर्वत्र पानांवर पसरतो. पानांवरील स्त्रावावर कालांतराने काळ्या बुरशीची वाढ होते. परिणामी, प्रकाश संश्लेषण क्रियेत अडथळा निर्माण होतो. चक्राकार पांढरी माशीच्या नियंत्रणासाठी झाडावर नियमित पाण्याची फवारणी करावी. तसेच पानावरील काळी बुरशीच्या व्यवस्थापनासाठी पानांवर पाण्याचा १ टक्के स्टार्च सोल्युशन फवारावे.<br>• तापमानात वाढ संभवत असल्याने नवीन लागवड केलेल्या नारळ बागेस ५ ते ६ दिवसांच्या अंतराने पाणी देण्याची व्यवस्था करावी तसेच तसेच आळ्यामध्ये ओलावा टिकविण्यासाठी नारळाच्या शेंडया पुराव्यात आणि झावळयांचे आच्छादन करावे.<br>• नवीन लागवड केलेल्या नारळाच्या रोपांची कडक उन्हामुळे पाने करपू नयेत म्हणून रोपांना वरून सावली करावी. |
| **सुपारी** | - | • तापमानात वाढ संभवत असल्याने सुपारी बागेस ४ ते ५ दिवसांच्या अंतराने पाणी देण्याची व्यवस्था करावी. |
| **भेंडी** | **फळधारणा** | • भेंडी पिकामध्ये तुडतुड्यांचा प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता असून तुडतुडे पानांतील अन्नरस शोषून घेतात त्यामुळे पाने विटकरी तांबडी व कडा नागमोडी दिसून येतात. तुडतुड्यांचा प्रादुर्भाव दिसून आल्यास नियंत्रणासाठी डायमेथोएट ३० टक्के प्रवाही १० मि. ली. किंवा लॅम्बडा सायहॅलोथ्रीन ५ टक्के प्रवाही ६ मि.ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. तसेच पिकामध्ये पिवळ्या चिकट कागदाच्या सापळ्याचा वापर करावा. |
| **सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीनुसारतयार करून प्रसारित करण्यात आली.<br>अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा** | | |